# अमरनाथची खरी अमरकथा

दरवर्षी ऑगष्ट महिन्यात भक्त लोक अमरनाथच्या यात्रेला जातात. भारताच्या कानाकोप-यातुन भक्त एकत्र येवून ही यात्रा करतात. वास्तविक डोंगराळ भाग,घाटाच्या रस्ते,दुर्गम असून सुद्धा मोठया प्रमाणात लोक श्रद्धेने 'अमरनाथ की जय' चा उद्घोष करत अमरनाथचे दर्शन करून स्वत:ला कृतार्थ समजतात. वास्तविक अमरनाथ, अमरकथा, अमरनाथाची गुहा इत्यादी सम्बंधी सत्य ज्ञान या लेखामध्ये प्रस्तुत केलेले आहे.

अमरनाथच्या गुह्वेला भारतातील प्रसिद्ध शिव मंदीरामध्ये जेणे करून मानले जाते. लोकांची मान्यता आहे की या स्थानावर शिवाने पार्वतीला 'अमरकथा' ऐकवली होती. त्याचबरोबर हे सुध्दा प्रसिद्ध आहे की, या गुह्वे मध्ये बर्फाचे जे शिवलिंग आहे ते आपोआप बनते. या ठिकाणी कबुतरांची जोडी सूध्दा ठेवली जाते, असे म्हटले जाते की, त्या कबुतरांनी सुध्दाही अमरकथा ऐकली होती, की ज्यामुळे ते सुध्दा अमर झाले. प्रत्येक वर्षी हजारोंच्या संखेने श्रद्धाळु - भक्त लोक मोठया भावनेने 'अमरनाथ' ची यात्रा करण्यासाठी जातात. आता हा प्रश्न निर्माण होतो की जीवनामध्ये खरी प्राप्ती - अमरनाथची यात्रा आणि दर्शन केल्याने होते का? की खरी अमरकथा ऐकल्याने जी परमपिता शिवाने ऐकवली होती? ती खरी अमरकथा आता आम्ही कुठे ऐकू शकू का? या प्रश्नाचे खरे उत्तर प्राप्त करण्यासाठी 'अमरनाथ' संबधी प्रचलीत भक्ती मार्गातील चाली-रीतीच्या मागे दडलेल्या गुह्य ईश्वरीय आध्यात्मिक रहस्यांचे मर्म जाणणे आवश्यक आहे. प्रचलीत मान्यता आहे की, अमरकथा पार्वतीने ऐकली होती. तेव्हा ही तर विवेक संगत गोष्ट आहे की, अमरकथा, जिच्यामुळे सद्‌गती अथवा अमर पदाची प्राप्ती होते ती कथा त्यांना ऐकण्याची गरज आहे जे, आता सद्‌गतीमध्ये नाहीत वा दुर्गती मध्ये आहेत. परंतु पार्वतीला तर सर्वजण देवी मानतात. त्यांना तर सद्‌गती, अमर पद अथवा देव पदाची प्राप्ती पूर्वी पासुनच होती. पार्वती काही थोडेच दुर्गतीमध्ये होती की तीला अमरकथा ऐकण्याची आवश्यकता पडली? दुसरी कथा तर केवळ खोटीच म्हणावी लागेल अमरकथा ऐकल्याने त्या कबुतरांची जोडी अमर झाली. विचार करा की, शिवाने अमरकथा मनुष्यांच्या भाषेमध्ये ऐकवली असेल तर काय कबुतर मनुष्यांची भाषा समजतात? मग, त्या बिचा-या कबुतराला हेच चांगले फळ मिळाले की तो नेहमीसाठी कबुतर बनूनच राहील? जर पशु-पक्ष्यांच्या योनींना मनुष्य लोक नीच योनी मानतात, तर त्या कबुतराला सद्‌गती मिळाली म्हणावे की श्राप? अमरपदाचा अर्थ 'शरीर न सोडणे' नाही. हे तर प्रकृतीच्या नियमा विरूध्द होईल. शरीराचा त्याग तर श्री.राधे, श्री.कृष्ण, श्री.सीता, श्री.राम या सर्वांनी केलेला होता. हे मात्र खरे आहे कि अमर लोकात 'अकालीमृत्यु' होत नाही. समजा आपण अमरनाथच्या पुजाऱ्यांना काही भेट वस्तु देऊन विचारले तर तो स्पष्ट सांगेल की -'एक कबुतर मेल्यानंतर त्या ठिकाणी दूसरे कबुतर ठेवले जाते आणि त्या ठिकाणी शिवलिंग सुध्दा बर्फापासून आपोआप बनत नाही, परंतु बनवले जाते, जेणे करून भक्तांची भावना आणि पुजाऱ्यांची उपजीविका दोन्हीही चालतील' आता प्रश्न निर्माण होतो की, पार्वतीने अमरकथा ऐकली नाही आणि कबुतराने ऐैकली नाही. तर मग ही कथा कोणी ऐकली? ही सुध्दा एक गुह्यता आहे. विचार करा की, देवी-देवतांना देवपदाची प्राप्ती कशी झाली असेल? वास्तवीक शिवाची ही अमरकथा कोणी एका वा दोन-चार व्यक्तिंनी नाही परंतु सत्वर सतयुगी सुर्यवंशी तसेच त्रेतायुगी, चंद्रवंशी घराण्यातील श्री.कृष्ण, श्री.राम इत्यादी सर्व देवी-देवतांनी आपल्या जीवनमुक्त देव पदाच्या पूर्व जन्मांमध्ये ऐकली होती. याचेच फलस्वरूप त्यांना सतयुग व त्रेतायुगामध्ये देव पदाची प्राप्ती होते. प्रसिध्द आहे की गोपेश्वर (वृंदावन) मध्ये ही श्री.कृष्ण आणि रामेश्वर मध्ये श्री. रामांनी शिवाची प्रतीमा स्थापन करून त्याची पूजा केली, त्यांच्या स्मरणार्थ त्या स्थानावर आज सुध्दा शिव

मंदीर पाहावयास मिळते. याच्यावरून सिध्द होते की श्री.कृष्ण, श्री.राम तसेच त्यांच्या वंशावळीचे अन्य सर्व देवी देवतांचे परमपिता, परमशिक्षक एवं परमसत्गुरू शिवच आहेत. ज्यांनी त्यांना पूर्व जन्मांमध्ये अमरकथा ऐकवून त्या सर्वांना देवी देवता पद प्राप्त करण्याच्या योग्य बनवले होते.

## खरी अमरकथा काय आहे ?

काही मनुष्यांचा तर्क आहे की, शिवाने पार्वतीला अमरकथा तिच्यासाठी ऐकवली नसेल परंतु भक्तांच्या कल्याणार्थ ऐकवली असेल. तेव्हा हे स्पष्ट होते की, भक्तांचे कल्याण अमरकथा ऐकल्यानेच होते अथवा होऊ शकते. परंतु अमरनाथ मध्ये तर केवळ बर्फाचे शिवलिंग पहावयास मिळते, तेथे तर पार्वती अथवा अमरकथा उपलब्ध सुध्दा नाही. भक्तजन तर फक्त अमरनाथचे दर्शन करून, काही रूपयांची देणगी देऊन हा विश्वास घेऊन परत येतात की यात्रेचे पुण्य जमा झाले असेल. अशा प्रकारचे पुण्य प्राप्त करण्याची खोटी आशा बाळगून ते बिचारे अनेक वेगवेगळया स्थानांची यात्रा सुध्दा करत असतात.

त्यामुळेच तर या भक्तांना 'अंध:श्रध्दाळु' म्हटले जाते. म्हणूनच एक म्हण प्रचलीत आहे की, 'ज्ञाना विना गती नाही' ( न की भक्ती वीना) तर ही आश्चर्याची गोष्ट नाही का की अमरनाथ या अन्य कुठल्याही स्थानावर सद्‌गती प्रदान करणारी अमरकथा ही उपलब्ध नाही? वास्तवीक 'अमरकथा' हे नाव स्वयं परमात्मा शिवद्वारे अज्ञान - अंधकार, शिवरात्री अथवा अती धर्मग्लानीच्या वेळी अर्थात कल्पांतच्या वेळी अवतरीत होऊन ऐकवीलेला रचीयता (परमात्मा) आणि मनुष्य सृष्टीरूपी रचनेचा आदी-मध्य-अंताच्या ज्ञानाचा आहे, ज्याच्या द्वारे ही नविन पावन,सतयुगी,दैवी सृष्टी (स्वर्ग अथवा वैकुंठ) ची पुनर्स्थापना आणि मनुष्यांना त्या स्वर्गामध्ये देवत्व पद अर्थात जीवनमुक्तीची प्राप्ती होते. कालांतराने त्या ख-या ईश्वरीय ज्ञानाच्या अमरकथेला 'ज्ञान सोमरस' 'सत्य नारायणाची कथा','तीजरी ची कथा' इत्यादी काही नावे दिले गेले आहेत. आणि तद्‌नुसार निराकार परमात्मा शिवाचे स्मारक-चिन्ह 'शिवलिंगा'च्या मंदिरावर ही 'सोमनाथ','विश्वनाथ','मुक्तेश्वर' इत्यादी कर्तव्यवाचक नावे पडली आहेत. सत्य तर हे आहे की 'श्रीमद् भगवत गीता' नाव सुध्दा स्वयं निराकार परमात्मा शिवा द्वारे ऐकलेली ती ज्ञान मुरली किंवा अमरकथाच आहे.

## परमात्मा शिव अमरकथा कुठल्या रूपामध्ये ऐकवतात ?

अमरकथा ऐकवण्यासाठी निराकार परमात्मा शिवाला साकार रूप धारण करावे लागते कारण जेव्हा ते मुखाद्वारे बोलतील तेव्हा मनुष्यात्मे कानांच्या द्वारे ती कथा ऐकतील. परंतु परमात्मा शिव तर पुनर्जन्म अथवा जन्म-मरनणाच्या चकरा पासुन सदा काळासाठी मुक्त आहेत. त्यामुळे शिवाला ' सदाशिव' सुद्धा म्हटले जाते. अमरकथा ऐकवण्यासाठी शिव परमात्मा 'दिव्य-जन्म' घेतात, ज्याच्या स्मृती स्वरूप 'शिव जयंती' अथवा 'शिवरात्री' प्रत्येक वर्षी साजरी केली जाते. ते साधारण मनुष्यासारखे मातेच्या गर्भामध्ये जन्म घेऊन नस-नाडीच्या बंधनामध्ये येत नाहीत. तर ते प्रकृतीला अधिन करून अथवा परकाया प्रवेश करून अर्थात अवतरीत होतात. मग प्रश्न असा निर्माण होतो की, परमात्मा कुठल्या साकार रूपामध्ये अवतरीत होतात. त्याचे रहस्य आपल्या देशामध्ये प्रचलीत लोक कथेमध्ये समाविष्ट केलेले आहे की ज्या मध्ये सांगीतले जाते की गंगा शिवाच्या जटेतून निघाली होती जिला भागीरथाने धरतीवर उतरवले होते. हा वृतांत काही शंकराच्या जटे मधुन निघणा-या पाण्याच्या गंगेचा नाही. ज्या प्रमाणे अंध:श्रध्दाळु मनुष्याने शिव आणि शंकरातील फर्क न जाणल्याने दाखविले त्यांना एकच समजले आहे ही कहानी पाण्याच्या गंगे साठी नाही की जिला पतीत-पावनी समजून

अंध:श्रध्देने लोक त्यामध्ये  स्नान करतात. गंगा-जल पितात तर वास्तवीक ही कथा शिवाद्वारे निघणारी खरी-खुरी पतीत-पावनी, ज्ञानगंगा अथवा अमरकथेसबंधी आहे. ज्यामध्ये ‘भागीरथ’ हे नाव ‘प्रजापिता ब्रह्मा’ साठी वापरले आहे. भागीरथचा अर्थ आहे ‘भाग्यशाली रथ’ अर्थात तो सौभाग्यशाली मनुष्य शरीररूपी रथ (शरीराला रथ सुध्दा म्हटले जाते) ज्यामध्ये प्रवेश करून परमात्मा शिव दिव्य आणि अलौकिक जन्म अथवा अवतार घेतात.

**वास्तविक ‘अमरकथा’ हे नाव स्वयं परमात्मा शिवाद्वारे अज्ञान अंधकार,शिवरात्री अथवा अती-धर्मग्लानीच्या वेळी अर्थात कल्पांताच्या वेळी अवतरीत होऊन ऐकवलेली रचयीता (परमात्मा) आणि मनुष्य सृष्टीरूपी रचनेचा आदि-मध्य-अंताच्या ज्ञानाचे आहे, ज्याच्या द्वारेच नविन पावन,सतयुगी दैवी सृष्टी (स्वर्ग अथवा वैकुंठ) ची पुनर्स्थापना आणि मनुष्यांना त्या स्वर्गामध्ये देवत्व पद अर्थात जीवनमुक्तीची प्राप्ती होते.**

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स
www.bkvarta.com